ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | AUG - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# संत चोखामेळा यांच्या अभंगातील कारुण्यपूर्णता



अरविं दविजय हंगरगेकर

## प्रास्ताविक -

महाराष्ट्राची भूमी ही संत महंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. या भूमीवर अनेक संत होऊन गेले. महाराष्ट्राला भक्तीधर्माची शिकवण संतांनी दिली. भक्ती, ज्ञान आणि आचारधर्म या सूत्रातून संतांची जीवनधारा व्यतीत झालेली आहे. या थोर संत परंपरेमध्ये अनेक संतांनी आपल्या कृती उक्तितून महाराष्ट्राला खूप मोठा आचारधर्म घालून दिलेला आहे. तीच वहीवाट वर्तमानापर्यंत आज महाराष्ट्राने सांभाळलेली पहावयास मिळते. या थोर संत परंपरेत अनेक संतांच्या बरोबरीने संत चोखोमेळा यांचाही नामउल्लेख आवर्जून करावा लागेल. संत चोखामेळा यांनी आपल्या अभंग रचनेच्या रूपाने विठ्ठलाविषयीची भक्ती प्रकट केलेली आहे.

संत चोखामेळा ज्या कालखंडात जन्माला आले, तो कालखंड आणि त्या काळाची सामाजिक परिस्थिती विचारात घेतली तर ज्या जातीमध्ये संत चोखामेळा जन्माला आले होते त्या जातीला समाजात माणूस म्हणून वावरण्याचा अधिकारही हिरावून घेतला गेलेला होता. अशा परिस्थितीमध्ये संत चोखामेळा यांनी भक्तीच्या जोरावर समाजात आपले श्रेष्ठत्व सिद्ध करून दाखविले आहे. त्यांच्या अभंगातून कारुण्याचा स्वर प्रकट होतो. कारुण्य भावनेने त्यांनी आपल्या व्यथा आणि वेदना विठ्ठलाशी चर्चिल्या आहेत. आपल्या दुःखाला हलके करणारा विठ्ठलच आहे हा विश्वास त्यांच्या भक्तीच्या केंद्रस्थानी होता. म्हणूनच ते विठ्ठलाला प्रसंगी भांडतानाही पाहावयास मिळतात. चोखामेळा यांच्या अभंगातून साकार झालेली कारुण्यता प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने विचारात घेता येते.

वारकरी पंथाची पताका आपल्या खांद्यावरती घेऊन वेगवेगळ्या जाती धर्मातील अनेक संत या कालखंडात पुढे आले. त्यांनी आपल्या भक्तीच्या आणि निष्ठेच्या जोरावर समाजातील विषमता दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. स्त्री, शूद्र, अस्पृश्य अशा सर्वच स्तरातील माणसांना सामावून घेणारा वारकरी संप्रदाय हा म्हणूनच श्रेष्ठ संप्रदाय म्हणून ओळखला जातो. या वारकरी संप्रदायामुळेच समाजात हीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महार जमातीतील अनेक भाविक भक्तिमार्गाकडे वळले. या परंपरेतील एक महत्त्वाचे विठ्ठलभक्त म्हणून संत चोखामेळा यांच्याकडे पाहिले जाते. सामाजिक दृष्टीने विचार करता त्यांना अतिशुद्र, गावाबाहेर राहणारा, दुःख आणि दैन्य या विवंचनेच्या गर्दीत अडकलेल्या कुळातील म्हणून ओळखले जात होते. या सामाजिक विषमतेच्या चक्रात अडकलेल्या संत चोखामेळा यांना मरणप्राय वेदना सहन कराव्या लागत होत्या. ज्ञानदेवांच्या

रूपाने यांना जगण्याचा मार्ग मिळाला आणि म्हणूनच संत परंपरेमध्ये गोरोबा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, बंका महार, सोयराबाई, कर्ममेळा, कान्होपात्रा अशा वेगवेगळ्या संतांच्या मांदियाळीचा वावर झालेला पहावयास मिळतो. या संत मांदीयाळीतील संत चोखामेळा यांच्या अभंगाचे प्रधान वैशिष्ट्य म्हणजे कारुण्यपूर्णता होय.

संत चोखोबांना विठ्ठल भक्तीने भारावून सोडले होते. परंतु इथली समाज व्यवस्था त्यांना विठ्ठलाच्या दर्शनाचीही मुभा देत नव्हती. अशा काळात संत चोखोबा विठ्ठल मंदिरात गेले व विठ्ठलाचे दर्शन त्यांनी घेतले. परंतु दुसऱ्या दिवशी कर्मठ विचारांच्या लोकांनी महाराने देव बाटविला म्हणून त्यांना मार दिला. देवानेच आपल्याला मंदिरात प्रवेश दिला. मग तो देव हे लोक आपल्याला मारत असताना यातून सोडवू शकत नाही. याबद्दलचे दुःख त्यांच्या मनात निर्माण झाले व या दुःखी अंतःकरणाने त्यांनी विठ्ठलाचा धावा केला. ते विठ्ठलाला उद्देशून म्हणतात,

“धाव घाली विठु आता चालू नको मंद ।

विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।।

शिव्या देती महारा (मारा) म्हणती देव बाटविला ।।”

आपल्या व्यथा आणि वेदना अशा अधिकारवाणीने संत चोखोबांनी विठ्ठलाला सांगितलेल्या पहावयास मिळतात. संत चोखोबांच्या अभंगातून साकार झालेली कारुण्यपूर्णता ही त्यांच्या जगण्यातून आलेल्या व्यथा आणि वेदनांचे प्रत्यक्षदर्शी चित्रण करणारी आहे. असेच म्हणावे लागेल.

हीन यातीत जन्माला आल्याने, अहंकारी स्वभावाच्या समाजाचा सातत्याने द्वेष सहन करावा लागल्याने संत चोखामेळा सातत्याने दुःखी राहायचे. आपल्या दुःखाची आणि व्यथा वेदनेची ते कधी कोणापाशी ही खंत बोलून दाखवत नसत परंतु विठ्ठलाला मात्र ते अधिकारवाणीने भांडायचे. त्यांच्या या भांडणातून त्यांच्या मनातील कारुणतेची प्रचिती वाचकांना त्यांच्या अभंगाच्या माध्यमातून येत राहते. ते आपल्याला सोसाव्या लागलेल्या व्यथा आणि वेदनानविषयीच्या जाणिवा विठ्ठलाशी रोखठोक भाषेमधून बोलत असत. ते म्हणतात,

“तुम्ही वाढविले तुम्ही पोरियेलें । तुम्हीच दाविले जग मज । तुमचा प्रकार तुमचा तुम्ही जाणा । आमुचिया खुणा जाणों आम्ही ।। तुम्हांसी तो भीड कासयाची देवा । हेचि केशवा सांगा मज ।। चोखा म्हणे काय बोलू येयावरी । माझा तु कैवारी देवराया ।।” लोकांकडून सतत अवहेलना सहन करणारे संत चोखोबा थेट विठ्ठलालाच प्रश्न करतात की, मला जन्माला घालणारे तुम्हीच आहेत, माझे पालन पोषण करणारे तुम्हीच आहात, मग मला सांभाळण्याची जबाबदारी तुमची आहे तरीही समाजात हे लोक माझ्याशी असे वागतात तेव्हा तुम्हीच मला यामधून सावरले पाहिजे असा अधिकारवाणीने भांडणारा भक्त चोकोबांच्या निमित्ताने पहावयास मिळतो.

समाजात महार जातीला हीन समजण्याची प्रवृत्ती त्या कालखंडात मोठ्या प्रमाणात वाढलेली होती. अशा लोकांना सावलीलाही उभे राहू दिले जात नव्हते. अशा लोकांची सावली घेणे म्हणजे विटाळ पडणे अशा प्रकारची दुष्ट प्रवृत्ती समाजामध्ये वाढलेली होती. अशा काळात संत चोखोबांना नेहमी खंत वाटायची की कुत्र्या, मांजरांना मंदिरामध्ये प्रवेश आहे परंतु माणसांना इथे देवदर्शनाला येऊ दिले जात नाही. समाजातील उच्च निच्चतेच्या भावनेतून सोसाव्या लागलेल्या व्यथा वेदना ते कारुण्यपूर्ण शब्दातून व्यक्त करतात. म्हणूनच संत चोखोबांच्या अभंगातून कारुणतेचा अविष्कार ठीक ठिकाणी प्रकट झालेला दिसून येतो. ती कारुण्यता संत चोखोबांच्या जगण्यातील मोठे दुःख घेऊन अभिव्यक्त होते. चोकोबांनी साकार केलेल्या या दुःखाला केवळ त्यांच्याच जीवनाचा भाग म्हणता येईल असे नाही तर, त्यांनी आपल्या समकालीन असणाऱ्या जाती धर्मातील सामान्य माणसांच्या व्यथा आणि वेदना प्राथमिक स्वरूपामधून आपल्या अभंगातून व्यक्त केल्या आहेत असेच म्हणावे लागेल.

समाजातील उच्च निच्चतेच्या भावनेतून सोसावा लागलेला विटाळ संत चोखोबांना प्रचंड वेदना देणार आहे. अशा सामाजिक दुःखातून आलेल्या अभंगाची जाणीवही तेवढीच तीव्र आहे. संत चोखोबा या विटाळाच्या अनुषंगाने लिहितात, “ "काळाचा विटाळ जीवशिवा अंगी । बांधलासे जगी दूढ गाठी || विटाळो विटाळ चवदाही भुवनें । स्थावर जंगम व्यापुनी विटाळाची ।। सुखासी विटाळ दुःखासी विटाळ| विटाळी विटाळ वाढला । विटाळाचे अंगी विटाळाचे फळ । चोखा तो निर्मळ नाम गाय” मानवी मनोवृत्तीच्या विघातक परिणामातून भोगाव्या लागणाऱ्या विटाळाविषयी अत्यंत तीव्र शब्दांमध्ये दुःख व्यक्त करताना संत चोखोबा कारुण्यपूर्ण शब्दातून आपल्या भावना शब्दबद्ध करतात.

स्वतःचा कामधंदा करीत चोखामेळा विठ्ठल नामात तल्लीन होत असे. या संसारात जीवन जगताना जे जे आघात त्यांना सोसावे लागले ते ते आघात विठ्ठल नामाच्या पुढे क्षिण होऊन गेले. विठ्ठलाच्या मनोमय मिलनामुळे चोकोबांना समाजाने दिलेले सर्व आघात सहन करण्याची ताकद प्राप्त झाली. संत चोखामेळा हे सामाजिक क्रांतीच्या मुशीतून निर्माण झालेले संत होते. त्यांच्या अभंग निर्मितीच्या मुळाशी कारुण्यमयता रसरसून भरलेली आहे. संत नामदेवांच्या विचाराने संत चोखामेळा विठ्ठल भक्तीत रममाण झाले. सामाजिक विषमतेने संत चोखोबांना भांडावून सोडले होते. सबंध विश्वाला पावन करणाऱ्या महात्म्याला आपल्या स्पर्शाने विटाळ कसा होईल? हे दुःख अंतरंगात घेऊन संत चोखोबा जगत होते. म्हणूनच त्यांनी ‘धाव घाली विठू आता’ अशी आर्त हाक विठ्ठलाला दिली होती. संत चोखामेळाच्या या मानसिक स्थितीचे नेमकेपण विशद करताना प्र. न. जोशी यांनी मांडलेले मत प्रस्तुत ठिकाणी विचारात घेणे महत्त्वाचे वाटते ते लिहितात, “नामदेवांच्या कृपेने चोखोबांना पंढरीचा देव सुलभ झाला. परंतु देवाच्या प्राप्तीची दुसरी बाजूही महत्त्वाची असल्याने ती थोडक्यात ध्यानात यावयास हवी. आपण हीन यातीत जन्मलो; आपण समाजापासून दूर आहोत; लोक आपणांस 'दूर हो, दूर हो !', म्हणतात, याची यथार्थं जाणीव चोखोबांना होती. 'नाहीं देह शुद्ध याति अमंगळ । अवधे ओं गळ गुणदोष||' म्हणून एका अभंगात त्यांनी तक्रार केली आहे : 'याती हीन माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥ मज दूर दूर हो म्हणती तुज भेटू कवण्या रीतीं ॥' असा एक रोखठोक प्रश्न त्यांनी विठ्ठलास विचारलेला आहे. एका अभंगात तर स्वतःवर ओढवलेल्या एका भयानक प्रसंगाचा उल्लेख करून त्यांनी आर्ततेने विठ्ठलास हाक मारली आहे' धांव घाली विठू आतां चालू नको मंद बडवे मज मारिती ऐसा कांहीं अपराध ।।' चोखोबांस बडवे मारावयास निघाले आहेत. या महाराने देव बाटवला, ' असा त्या ब्राह्मणांचा आरोप आहे. आणि चोखोबांस समजेना की, सर्व जगास पावन करणाऱ्या देवास आपण कसे बाटवणार ? आपल्या अंगी एवढे सामर्थ्य कोठले ?” जोशी यांच्या या मतावरून संत चोखोबाच्या मनात निर्माण झालेला प्रश्न चोकोबांच्या विठ्ठल भक्तीचे श्रेष्ठत्व सिद्ध करणार आहे असे म्हणावे लागेल.

संत चोखामेळा व त्यांचे सर्व कुटुंबीय विठ्ठल भक्तीने रंगून गेले होते. त्यांच्या कुटुंबातील प्रत्येकाने अभंग रचना केलेली आहे. अस्पृश्य संतांच्या मनातील सामाजिक दुखणे आणि त्यांच्या मनाचा आत्मिक विकास याचे भावस्पर्शी चित्रण हे संत चोखामेळा व कुटुंबीयांच्या अभंगातून प्रतिबिंबित होते संत चोखामेळा यांचे जोहाराचे अभंग हे कारूण्यपूर्णतेने भरलेले अभंग आहेत. चोखोबांच्या या अभंगातील कारुण्यपूर्णता पुढे संत तुकाराम महाराज व एकनाथांच्या अभंगातही आलेली दिसून येते. संत चोखोबा आपल्या जोहाराच्या अभंगातून मनातील भावनांचा कल्लोळ शब्दबद्ध करताना ज्या पद्धतीने व्यक्त होतात त्यांच्या या व्यक्त होण्यातून विठ्ठलाविषयीची आर्त जाणीव प्रकट होते. त्याचबरोबर दुःखाने पोखरून गेलेल्या संत चोखामेळांना विठ्ठल भक्तीच्या निमित्ताने जी ऊर्जा प्राप्त होते त्याचेही दर्शन घडते. जोहाराचा हा अभंग या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो, “ जोहार मायबाप जोहार । तुमचे महाराचा मी महार ॥ १ ॥ बहु भुकेला झालों । तुमच्या उष्ट्यासाठीं आलों ॥ध्रु० ॥ बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास ॥ २ ॥ चोखा म्हणे पाटी | आणली तुमच्या उष्ट्यासाठीं ॥ ६ ॥” जन्माने जरी आपण हीन असलो तरी भक्तीने निर्मळ आहोत. यासाठीच आपण विठ्ठलाच्या भक्तीचे भुकेले असल्याची जाणीव संत चोखोबा आपल्या अभंगातून व्यक्त

करतात. त्याचबरोबर विठ्ठलाचा दास होऊन आपण जगण्यासाठीच आलेलो आहोत हा विश्वासही ते आपल्या अभंगातून व्यक्त करतात. एकूणच संत चोखामेळा यांच्या अभंगातून साकार झालेली कारुण्यपूर्णता त्यांच्या वाट्याला आलेल्या जगण्याचे भावस्पर्शी दर्शन तर घडवितेच पण त्याचबरोबर या कारुण्यतेतून विठ्ठल भक्तीने दिलेला आत्मिक आधार संत चोखोबांच्या जगण्यातील किती महत्त्वाचा धागा होता याचीही प्रचिती वाचकाला येते.

**सारांश :**

अशाप्रकारे शेवटी सारांश रूपाने सांगता येते की, संत चोखामेळा यांनी नामदेवाच्या कृपेने विठ्ठल भक्तीचा लोभ आत्मसात केला. विठ्ठलाच्या भक्तीसाठी ते कासावीस झाले, परंतु आपण हीन जातीत जन्मलो, आपण समाजापासून दूर आहोत, लोक आपणास 'दूर हो! दूर हो!' असे म्हणत राहतात. याची यथार्थ जाणीव चोकोबांना होती, म्हणून त्यांनी कुठल्याच आपल्या अभंगातून कसल्याही प्रकारची तक्रार केली नाही. परंतु विठ्ठलाशी मात्र ते रोखठोक प्रश्न विचारण्यास धजले नाहीत. ज्या ज्या वेळी संकट समयाला त्यांना सामोरे जावे लागले त्या त्या वेळी त्यांनी विठ्ठलाला आर्त हाक मारली आहे.'धाव घाली विठू आता| चालू नको मंद| बडवे मज मारीती| ऐसा काही अपराध' हा थेट सवालही ते विठ्ठलाला करतात. म्हणूनच संत चोखोबांच्या अभंगातून कारुण्यपूर्णतेची जाणीव सातत्याने अभिव्यक्त होते. एकूणच त्यांच्या अभंगाच्या निर्मितीच्या मुळाशी कारुण्यपूर्णता हीच मूलभूत प्रेरणा होती असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. संत चोखोबांच्या कारुण्यतेला भक्तीची जोड मिळाली म्हणूनच संत चोखोबा हे संतश्रेष्ठ ठरलेले आहेत असे म्हणता येते.

**संदर्भ :**

१) मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्र. न. जोशी
२) संत चोखोबांचे अभंग समीक्षा आणि संहिता, डॉ. रमेश मोदी
३) संक्षिप्त मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास, अतुल देशमुख
४) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, डॉ.बी. एस. पाटील
५) श्री संत चोखामेळा समग्र अभंगगाथा व चरित्र, प्राचार्य डॉ. आप्पासाहेब पुजारी